CMYK

गावागावात 'आपला विदर्भ' >>पान 2

सरकारी शाळांमध्ये मतदान केंद्र न ठेवता भाजपच्या कार्यालयांमध्ये मतदान केंद्र ठेवावे : बच्चू कडूंची टिका >>पान 3

डॉ.मंगेश बाजड यांच्या वाढदिवसाच्या निमित्त जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप >>पान 4

दैनिक

# आपला विदर्भ



ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर यांचं निधन; तेजस्विनी पंडितला मातृशोक

आतील पान

**सुविचार**

दुसऱ्यांच्या आनंदात आपला आनंद शोधा.

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 27 ■ रविवार, दि. 17 ऑगस्ट 2025 ■ पाने 8 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# मुंबई महापालिका निवडणुकीत परिवर्तनाची हंडी फोडणार : मुख्यमंत्री







**मुंबई/प्रतिनिधी :** यंदाच्या दहीहंडी उत्सवाला राजकीय रंग चढलेला दिसून येत आहे. सत्तेची हंडी फोडण्यासाठी नेत्यांची धडपड आणि कार्यकर्त्यांची लगबग, यामुळं मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उत्सवाचं स्वरूप अधिकच रंगतदार आणि स्पर्धात्मक झालं आहे. पावसाच्या साथीनं राजकीय टोलेबाजी, आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. अशात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई पालिका निवडणुकीत परिवर्तनाची हंडी फोडणार, असा विश्वास व्यक्त करीत कार्यकर्त्यांच्या उत्साहात भर घातली आहे.

भाजपाच्या वतीनं वरळी येथील जांबोरी मैदानात आयोजित परिवर्तन दहीहंडी उत्सवात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहभागी झाले. छावा सिनेमातील दृष्यांवर आधारीत मानवी मनोरे रचत इथं छत्रपती संभाजी महाराजांना अनोखी मानवंदना देण्यात आली. त्यातील चमुचं मुख्यमंत्र्यांनी विशेष कौतुक केलं. यावेळी माध्यमांशी संवाद साधताना देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं, ''मुंबई महानगरपालिकेत परिवर्तन अटळ आहे. महापालिकेतील पापाची हंडी आम्ही फोडलेली आहे. आता त्या ठिकाणी विकासाची हंडी लावली जाईल. त्या विकासाच्या हंडीतलं लोणी जनसामान्यांपर्यंत नेण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे,'' असं त्यांनी म्हटलं आहे.

मुंबई महापालिकेतील लोणी नेमकं कुणी खाल्लं असा प्रश्न माध्यमांनी विचारला असता, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सावध प्रतिक्रिया दिली. त्यांनी सांगितलं की, ''इतकी वर्ष लोणी कुठं जात होतं, हे तुम्हालाही माहिती आहे. तुम्ही माझ्या तोंडून हे काढून घेण्यासाठी प्रश्न विचारात आहात. पण जनतेला सगळं माहिती आहे,'' असं सांगत देवेंद्र फडणवीस यांनी नाव घेणं टाळलं. तसंच ''सण, उत्सवांवरची सगळी बंधनं आधी एकनाथ शिंदे आणि आता मी हटवून टाकली. त्यामुळं गोविंदांचा उत्साह प्रचंड आहे. काल रात्रीपासून मुंबईत जोरदार पाऊस होतोय. पण, गोविंदांच्या उत्साहाचा पाऊस त्यापेक्षा मोठा आहे,'' असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

भाजपाचे आमदार राम कदम यांनी घाटकोपरमध्ये आयोजित केलेली ऑपरेशन सिंदूर हंडी यंदा चर्चेचा विषय ठरली. या दहीहंडी उत्सवाला देखील मुख्यमंत्र्यांनी भेट दिली. यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं की, ''राम कदम हे २००९ पासून घाटकोपरमध्ये भारतातील सर्वात मोठी दहिहंडी भरवतात. मला अतिशय आनंद आहे, की यंदाची इथली हंडी ऑपरेशन सिंदूरला समर्पित आहे. ऑपरेशन सिंदूर पाकिस्तानच्या पापाची हंडी फोडणार होतं. आमच्या वीर सैनिकांनी पाकिस्तानात घुसून दहशतवाद्यांचे अड्डे उद्‌ध्वस्त केले. हवाई अड्डे उखडून काढले. संपूर्ण जगानं भारताच्या सैन्यांची ताकद ऑपरेशन सिंदूरवेळी बघितली. भारतीय सैनिकांना मानवंदना देण्याकरिता दहिहंडीचं आयोजन केल्याबद्दल राम कदम यांचे आभार मानतो'', असंही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आ. कालिदास कोळंबकर आणि मिहिर कोटेचा यांनी आयोजित केलेल्या दहिहंडी उत्सवालाही भेट दिली.

## बीडमध्ये जोरदार पावसाचा तडाखा; मांजरा प्रकल्प तब्बल ८० टक्के भरला, धाराशिव लातूरसह बिदर प्रशासनाला सतर्कतेच्या सूचना

**बीड/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मांजरा प्रकल्पात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे पाणीसाठ्यात मोठी वाढ झाली आहे. प्रकल्प तब्बल ८० टक्क्यांपर्यंत भरला असून, पुढील दोन दिवसांत आणखी पावसाचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. त्यामुळे धरणाचे दरवाजे उघडण्याची वेळ येऊ शकते, अशी शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे बीड, लातूर, धाराशिव आणि कर्नाटकातील बिदर जिल्ह्यातील प्रशासनाला सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पाटबंधारे विभागाने याबाबतचे पत्र संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना पाठवले असून, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत.

पूरस्थितीचा इशारा

जर धरणातून पाण्याचा विसर्ग करावा लागला, तर मांजरा नदीच्या पात्रालगतच्या गावांमध्ये पूरस्थिती निमर्णि होण्याची भीती आहे. त्यामुळे बीड, लातूर, धाराशिव आणि कर्नाटकातील बिदर जिल्ह्यातील प्रशासनाला सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पाटबंधारे विभागाने याबाबतचे पत्र संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना पाठवले असून, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत.

## रायगडला मुसळधार पावसाने झोडपले; अंबा कुंडलिका नद्यांनी इशारा पातळी ओलांडली



**अलिबाग/प्रतिनिधी :** मुसळधार पावसाने रायगड जिल्ह्याला झोडपून काढले आहे. जिल्ह्यात २४ तासात सरासरी ८० मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. अंबा आणि कुंडलिका नद्यांनी इशारा पातळी ओलांडली असून, नदी किनाऱ्यांवरील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

गेल्या दोन दिवसांपासून रायगड जिल्ह्यात पावसाची संततधार कायम आहेत. शनिवारी सकाळी आठ वाजेपर्यंत संपलेल्या २४ तासात अलिबाग ७१ मिमी, पेण ६३ मिमी, म्हसळा १५८ मिमी, माणगाव ३७ मिमी, उरण ८२ मिमी, श्रीवर्धन १३५ मिमी, खालापूर ७२ मिमी, रोहा ४० मिमी, पोलादपूर १२८ मिमी, मुरुड ५० मिमी, सुधागड ३४ मिमी, तळा ४८ मिमी, पनवेल १४१ मिमी, महाड ७९ मिमी, कर्जत ७२ मिमी तर माथेरान येथे ८० मिमी पावसाची नोंद झाली आहे.

मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील नद्यांच्या पातळीत मोठी वाढ झाली आहे. कुंडलिका आणि अंबा नद्यांनी सकाळी १० वाजता इशारा पातळी ओलांडली आहे. त्यामुळे रोहा आणि नागोठणे परिसराला पूरपरिस्थितीचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नदी किनाऱ्यांवरील गावांना सतर्कतेचा इशारा जारी केला आहे. संततधार पावसामुळे जिल्ह्यात सखल भागात पाणी साचणे, वीज पुरवठा खंडीत होणे आणि वृक्ष उन्मळून पडणे यासारख्या घटना घडल्या आहेत.

मुळशी, रवाळजे परिसरात सुरू असलेल्या पावसामुळे भीरा जलविद्यूत प्रकल्पाचे तीन दरवाजे उघडण्यात आले असून, प्रतिसेकंद ६२ घन मीटर वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे कुंडलिका नदीच्या पातळीत आणखिन वाढ होण्याची शक्यता आहे. सावित्री, पाताळगंगा आणि उल्हास नद्यांच्या पातळीत वाढ झाली आहे. दरम्यान पुढील दोन दिवस जिल्ह्यात पावसाचा जोर कायम राहील असा अंदाज प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे.

## स्वातंत्र्यदिनादिवशी धुळ्यात ८ वर्षांच्या चिमुरडीवर लैंगिक अत्याचार

## संतप्त नागरिकांनी आरोपीचे हॉटेल फोडलं, घटनेनं संताप

**दैनिक आपला विदर्भ**

**धुळे/प्रतिनिधी :** शिरपूर तालुक्यात एका चिमुरडीवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना समोर आली आहे. काल शुक्रवारी (१५ ऑगस्टच्या) दिवशी धक्कादायक घटना घडली आहे, या घटनेनंतर संतप्त नागरिकांनी आरोपीचे हॉटेल फोडले आहे. देशभरात स्वातंत्र्य दिनाचा जल्लोष सुरू असताना दुसरीकडे धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यात ८ वर्षीय चिमुरडीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटनेने संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणी तालुका पोलिसांनी आरोपी अनिल काळे (वय २८, व्यवसाय - हॉटेल) याला ताब्यात घेतले असून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती पसरताच संतप्त नागरिकांनी आरोपी अनिल काळे याच्या शिरपूर साखर कारखान्याच्या समोर असलेल्या हॉटेलची तोडफफोड केली.

१५ ऑगस्ट रोजीच आरोपीने ८ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार केला होता. घटनेचे वृत्त वाऱ्यासारखे पसरताच ग्रामस्थांमध्ये संताप उसळला. आरोपीवर तात्काळ कठोर कारवाई करून खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवावा, अशी मागणी करण्यात आली आहे. आज सकाळी घटनास्थळी फॉरेन्सिक लॅबचे टिम दाखल झाले होते, यावेळी पोलीस उपविभागीय अधिकारी सुनील गोसावी सांगवी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जयपाल हिरे यांनी सदर घटनाची पाहणी केली. या घटनेनंतर संपूर्ण शिरपूर तालुका हादरून गेला आहे. संतप्त जमावाने आरोपीच्या हॉटेलची तोडफफोड केली असून प्रकरणाचा पुढील तपास शिरपूर तालुका पोलीस करीत आहेत.

बसमधील तरुणाच्या त्रासाला कंटाळून महाविद्यालयीन तरुणीने आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. हातकणंगले तालुक्यातील किणी येथे ही घटना घडली आहे. या घटनेची नोंद पेठवडगाव पोलिसात करण्यात आली आहे. आत्म हत्या केलेल्या मुलीला न्याय मिळावा यासाठी गावात निषेध मोर्चा देखील काढण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बसमध्ये तरूण त्रास देत होता, त्या त्रासाला कंटाळून या तरूणीने घरामध्ये कोणी नसताना टोकाचं पाऊल उचलत जीवन संपवलं आहे.

अल्पवयीन मुलाच्या त्रासाला कंटाळून एका महाविद्यालयीन तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. हातकणंगले तालुक्यातील किणी येथे ही घटना घडली. संबंधित अल्पवयीन तरुण बसमधून येत असताना त्रास देत असल्याचा प्रकार पीडित मुलीने आईला सांगितलेला होता. आईने पोलीस ठाण्यात तक्रार देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र त्यानंतर आई घरात नसताना आलेल्या तरुणीने गळफास घेऊन आपलं जीवन संपवलं. आत्म हत्येच्या या घटनेने संपूर्ण परिसर हादरला आहे. एकतर्फी प्रेमातून संबंधित तरुण त्रास देत असावा असे चर्चा परिसरात आहेत. पोलिसांनी याप्रकरणी अल्पवयीन मुलास ताब्यात घेऊन कोल्हापूर येथील बालसुधारगृहात पाठवलं आहे. पेठवडगाव पोलिसांत याप्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या घटनेनंतर ग्रामस्थांनी कॅन्डल मार्च काढून श्रद्धांजली वाहिली. बसमध्ये होत असलेल्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केलेल्या मुलीला आणि कुटुंबाला न्याय मिळावा यासाठी निर्धार ही या मोर्चातून करण्यात आला.

## धोक्याची रात्र! महातुफान येतंय, तब्बल १६० किमी वेग, हवामान विभागाचा अलर्ट

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** आजची रात्र धोक्याची आणि काळरात्र ठरू शकते. समुद्रातून भयंकर तुफान येतंय हवामान विभागाने याबाबतचा महत्त्वाचा अलर्ट दिला आहे. अरबी समुद्र आणि पश्चिम बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. त्यामुळे समुद्रकिनाऱ्यालगच्या राज्यांमध्ये पुढचे ७ दिवस अति मुसळधार पाऊस राहणार आहे. तर समुद्रात खोलवर आणखी काहीतरी घडतंय, ज्यामुळे अचानक वाऱ्यांची दिशा बदलली आहे. वारे वेगानं वाहू लागले आहेत. संकटाची ही चाहूल असल्याचं काही तज्ज्ञांनी म्हटलं आहे.

अटलांटिक महासागरात निर्माण झालेल्या एरिन वादळाने वेग घेतला आहे. पुढील काही दिवसांत ते एका मोठ्या वादळात रूपांतरित होण्याची शक्यता आहे. अमेरिकेच्या राष्ट्रीय चक्रीवादळ केंद्राने (एनएचसी) शुक्रवारी रात्री उशिरा जारी केलेल्या आपल्या सल्लागारात म्हटले आहे की, हे वादळ रविवारपर्यंत अति तीव्र होण्याची शक्यता आहे. त्याच पार्श्वभूमीवर हाय अलर्ट दिला आहे.

एनएचसीच्या मते, एरिन वादळ लीवर्ड बेटांच्या उत्तरेकडे सरकत आहे आणि त्यामुळे पुढील २४ तासांत अँगुइला, सेंट मार्टिन, सेंट बार्थेलेमी, साबा, सेंट युस्टाटियस आणि सिंट मार्टिन सारख्या भागात उष्णकटिबंधीय वादळाची परिस्थिती निर्माण होऊ शकते. शुक्रवारी रात्री ८ वाजेपर्यंत वादळाचा वेग ताशी ८५ किमी वेगाने वारे वाहता होते. रात्री ११ वाजेपर्यंत १०० किमी प्रति किमी होता. तोच १६० किमीपर्यंत वाढण्याचा धोका आहे. हे वादळ दिसेल त्याला घेऊन जाईल त्यामुळे सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत. घराबाहेर न पडण्याचा इशारा दिला आहे. हवामान खात्याने अंदाज वर्तवला आहे की हे वादळ उत्तर लीवर्ड बेटे, व्हर्जिन बेटे आणि प्यूर्टो रिकोच्या अगदी जवळून जाईल. या क्षेत्रांसह, टर्क्स आणि कैकोस आणि आग्नेय बहामासला सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.




दैनिक आपला विदर्भाच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त आमदार सिद्धार्थ खरात सह मान्यवरांनी दिल्या पुढील वाटचालीस शुभेच्छा..!

CMYK

## नेतृत्व, कर्तृत्व, वक्तृत्व यांचा सुरेख संगम अटलबिहारी वाजपेयी

कवी मनाचे, प्रखर राष्ट्रवादी अशी प्रतिमा असणारे भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची काल १६ ऑगस्ट रोजी पुण्यतिथी होती. २५ डिसेंबर १९२४ रोजी जन्मलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांनी कानपूरमधून राज्यशास्त्रात एम ए ची पदवी मिळवली. पदवी मिळविल्यानंतर वाजपेयी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते बनले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम करता करता त्यांनी पत्रकारिताही केली. राष्ट्रधर्म, पांचजन्य आणि वीर अर्जुन या नियतकालिकांसाठी त्यांनी पत्रकारिता केली. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात भाग घेऊन त्यांनी राजकीय कारकीर्द सुरू केली. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी १९५१ साली जनसंघांची स्थापना केली. जनसंघाच्या स्थापनेत श्यामाप्रसाद मूखर्जी इतकाच अटलबिहारी वाजपेयी यांचाही वाटा आहे. १९५७ साली पहिल्यांदा ते जनसंघाच्या तिकिटावर लोकसभेत पोहचले. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांनी त्यांनी लोकसभेत ठसा उमटवला. त्यांचे भाषण ऐकण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू आवर्जून लोकसभेत उपस्थित राहत. पंडित जवाहरलाल नेहरु अटलजींच्या वक्तृत्वाने मोहित झाले होते. अटलबिहारी वाजपेयी एकदिवस भारताचे पंतप्रधान बनतील असे भविष्य त्यांनी वर्तवले होते. अटलबिहारी वाजपेयी सलग ९ वेळा लोकसभेवर निवडून गेले होते. १९६८ साली ते जनसंघाचे अध्यक्ष बनले. पक्षाध्यक्ष या नात्याने जनसंघ घरोघरी पोहचवण्याचे काम त्यांनी केले. त्याचवेळी विरोधी पक्षाची भूमिकाही त्यांनी तितक्याच प्रभावीपणे बजावली. १९७५ साली पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली. या आणीबाणीला त्यांनी प्रखर विरोध केला. आणीबाणीला विरोध केला म्हणून त्यांना दोन वर्षाचा कारावास भोगावा लागला. आणीबाणी उठल्यानंतर इंदिरा गांधी यांना पदावरुन हटवण्यासाठी सर्व विरोधी पक्ष एकत्र येऊन त्यांनी जनता पार्टी नावाचा पक्ष स्थापन केला. अटलबिहारी वाजपेयी यांनीही आपला जनसंघ हा पक्ष जनता पार्टीमध्ये विलीन केला. पण अवघ्या तीन वर्षात १९८० साली त्यांनी मुंबईत भारतीय जनता पार्टीची घोषणा केली. मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळात अटलजी परराष्ट्रमंत्री होते. परराष्ट्रमंत्री या नात्याने त्यांनी इतर देशांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. परराष्ट्रमंत्री म्हणून संयुक्त राष्ट्र संघात त्यांनी हिंदीतून भाषण केले. संयुक्त राष्ट्र संघात हिंदीतून भाषण करणारे ते पहिले नेते होते. १९९६ साली ते पहिल्यांदा पंतप्रधान बनले पण लोकसभेत बहुमत सिद्ध न करता आल्याने अवघ्या तेरा दिवसांतच त्यांचे सरकार पडले. त्यानंतर १९९८ साली ते पुन्हा पंतप्रधान बनले यावेळी मात्र त्यांचे सरकार तेरा महिने टिकले. पण या तेरा महिन्यात त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता त्यांनी अणुस्फोट करून आपले सामाजिक व वैज्ञानिक श्रेष्ठत्व सिद्ध केले. ते पंतप्रधान असतानाच भारताने कारगिल युद्ध जिंकले होते. जय जवान, जय किसान, जय विज्ञान ही घोषणा त्यांनी दिली. १९९९ साली तिसऱ्यांदा ते पंतप्रधान बनले. यावेळी मात्र त्यांचे सरकार पाच वर्ष टिकले. सलग पाच वर्ष पंतप्रधान राहिलेले ते पहिले बिगर काँग्रेसी पंतप्रधान होते. अटलबिहारी वाजपेयी हे उत्कृष्ट कवी होते त्यांच्या सर्व कविता लोकप्रिय झाल्या त्यातील आओ फिरसे दिया जलाये.... ही कविता लोकांना खूप आवडली. त्यांनी सुमारे ४० पुस्तकांचे लेखन केले. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. उत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कार त्यांना अनेकवेळा मिळाला. सरकारने त्यांना पद्मविभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविले. भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार त्यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला. नेतृत्व, कर्तृत्व आणि वक्तृत्व यांचा सुरेख संगम असलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांचे १६ ऑगस्ट २०१८ रोजी निधन झाले. अटलबिहारी वाजपेयी यांना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन!

# गावागावात 'आपला विदर्भ'



दैनिक आपला विदर्भ चे यशस्वी तीन वर्ष, वाचकांचा उत्तम प्रतिसाद..!

## मुंबईची तुंबई : विक्रोळीत दरड कोसळून दोन ठार



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** :मायानगरीत रात्रभर कोसळलेल्या पावसानं मुंबईची पार तुंबई केली आहे. मुंबई परिसरातील विक्रोळी उपनगरात दरड कोसळून दोघांचा मृत्यू झाला. ही घटना शनिवारी पहाटे अडीच वाजताच्या सुमारास घडली. सुरेश मिश्रा (वय ५०) आणि शालू मिश्रा ( वय १९) असं दरड कोसळून ठार झालेल्या दोघांची नावं आहेत. हे दोघं बाप आणि मुलगी असल्याची माहिती सूत्रांनी दिली. तर आरती मिश्रा (वय ४५) आणि ऋतुराज मिश्रा (वय २०) या दोघांवर राजावाडी रुग्णालयात उपचार सुरू आहेत, असंही महापालिकेच्या सूत्रांनी सांगितलं. दरम्यान मुंबईतील अंधेरी, कुर्ला, चेंबूर परिसरातील सखल भागांत पाणी साचलं आहे. महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या माहितीनुसार शहरात मध्यरात्री १ ते पहाटे ४ वाजेपर्यंत विक्रमी पाऊस पडला आहे.

दरड कोसळून बाप आणि मुलीचा मृत्यू : मुसळधार पावसामुळे मुंबईतील विक्रोळी परिसरातील वर्षानगरमध्ये भूस्खलन झालं आहे. या अपघातात दोघांचा मृत्यू झाल्याची माहिती महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागानं दिली आहे. महापालिकेच्या माहितीनुसार, सदर घटना मध्यरात्री २:३९ वाजता घडली असून, अग्निशामन विभागाकडं सकाळी ५.५० वाजता ही दुर्घटना नोंदवली. डोंगराळ भागातून माती आणि दगड घसरून एका झोपडीवर पडले. या अपघातात चार जण जखमी झाले. जखमींना राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. यात उपचारादरम्यान दोघांचा मृत्यू झाला. १९ वर्षीय शालू मिश्रा आणि ५० वर्षीय सुरेश मिश्रा अशी मृतांची नावं आहेत. तर आरती मिश्रा ( ४५ वर्ष) आणि ऋतुराज मिश्रा ( २० वर्ष ) यांना ट्रॉमा वॉर्डमध्ये दाखल करण्यात आलं आहे. त्यांची प्रकृती आता स्थिर असल्याची माहिती महापालिकेनं दिली आहे.

रात्रीपासून मुंबईत पावसाची मुसळधार बॅटिंग सुरू : शुक्रवारी रात्रीपासून मुंबईत पावसाची मुसळधार बॅटिंग सुरू आहे. काही ठिकाणी सखल भागातील रस्ते पाण्याखाली गेले असून, काही ठिकाणी घरात पाणी शिरल्याच्या घटना समोर आल्या आहेत. शुक्रवारी सायंकाळपासून मुंबईत पाऊस सुरू आहे. मध्यरात्री पावसाचा जोर वाढला. मुसळधार पावसामुळे अंधेरी, कुर्ला, चेंबूर परिसरातील सखल भागांत पाणी साचलं आहे. महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या माहितीनुसार, मध्यरात्री १ ते पहाटे ४ वाजतापर्यंत विक्रमी पाऊस पडला आहे. रात्री जन्म ष्टमीनंतर आज मुंबईत सर्वत्र मोठ्या उत्साहात दहीकाला साजरा केला जातो. मात्र, या दहीहंडीच्या आधीच पहाटेपासूनच मुंबईत मुसळधार पाऊस पडला. त्यामुळे आता मुंबईत दहीहंडीला गोविंदांचा प्रतिसाद कसा मिळतो, हे पाहणं महत्त्वाचं आहे.

## ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर यांचं निधन; तेजस्विनी पंडितला मातृशोक

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी** : अभिनेत्री तेजस्विनी पंडितची आई, ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर यांचं शनिवारी निधन झालं. वयाच्या ६९ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनानं सिनेसृष्टीतील सर्वांना धक्काच बसला. मराठी चित्रपटसृष्टीमधील लोकप्रिय ज्येष्ठ अभिनेत्री अशी ज्योती चांदेकर यांची ओळख होती. त्यांना पूर्णा आजी या नावानंही ओळखलं जायचं. रविवारी सकाळी पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

गेल्या २-३ दिवसांपासून पुण्यातील खासगी रुग्णालयात ज्योती चांदेकर यांच्यावर उपचार सुरु होते. त्यांच्या निधनानंतर मराठी चित्रपटसृष्टीमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. ज्योती चांदेकर या एक मराठी नाट्य तसंच चित्रपट क्षेत्रातील ज्येष्ठ अभिनेत्री असून, अनेक मराठी चित्रपटांमध्ये त्यांनी काम केलंय. तसंच अनेक मालिकांमध्ये देखील त्यांनी काम केलं आहे. पाऊलवाट, मी सिंधूताई सपकाळ, सलाम, सांजपर्व, गुरू, ढोलकी, तिचा उंबरठा अशा विविध चित्रपटांमध्ये त्यांनी विविध प्रकारच्या भूमिका केल्या आहेत. २०१७ मध्ये त्यांना नाट्य परिषदेच्या पुणे शाखेतर्फे जीवनगौरव पुरस्कार देखील देण्यात आला होता.

ठरलं तर मग या मालिकेतील पूर्णा आजींच्या भूमिकेतून त्या खूपच लोकप्रिय झाल्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर रविवारी सकाळी ११ वाजता पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार पार पडणार आहेत. त्यांच्या पश्चात दोन मुली आहेत. त्यातील तेजस्विनी पंडित ही मराठी कलाविश्वातील प्रसिद्ध अभिनेत्री आहे. त्यांच्या निधनामुळे मराठी कलाविश्वावर शोककळा पसरली आहे.

## सुरज चव्हाण आमच्या पक्षाचा जुना आणि ज्येष्ठ सहकारी असल्यानचं फेरनियुक्ती : प्रफुल पटेल यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**भंडारा/प्रतिनिधी** : राष्ट्रवादी काँग्रेसचे आमचे माजी युवकचे अध्यक्ष सुरज चव्हाण यांना आम्ही पक्षाच्या राज्य पातळीची जबाबदारी दिली आहे. हा निर्णय सुनील तटकरे आणि सर्व ज्येष्ठ नेत्यांनी बसून घेतलेला आहे. शेवटी एक काम करणारा माणूस त्यांच्या हातून जर काही चूक झाली असेल तर त्यांना आम्ही त्या पदावरून आठवलं. शेवटी तो आमच्या पक्षाचा जुना आणि ज्येष्ठ सहकारी आहे. त्यामुळे त्याला काहीतरी जबाबदारी दिली पाहिजे, म्हणून त्याची आम्ही नियुक्ती केली आहे. पक्षांमध्ये त्याबद्दल कुठलीही मतभिन्नता नसल्याचं स्पष्टीकरण प्रफुल पटेल यांनी दिलं. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांची छावा संघटनेच्या नेत्यांना मारहाण केल्यानंतर हकालपट्टी करण्यात आली होती. मात्र, आता परत एकदा त्यांना फेरनियुक्ती देताना प्रदेश सरचिटणीसपद दिलं, यावर प्रफुल पटेल भंडाऱ्यात बोलत होते.

मंडल यात्रेनिमित्त भंडाऱ्यात आलेल्या रोहित पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या भवितव्याबाबत वक्तव्य केलं होतं. जर, अजित पवारांनी भाजपची साथ सोडली आणि पुरोगामी विचार स्वीकारून शरद पवारांच्या नेतृत्वात यायला तयार असेल, तर दोन्ही राष्ट्रवादी पक्ष एकत्र येईल, असं वक्तव्य केलं होतं.

यावर बोलताना प्रफुल पटेल यांनी, कोणाच्या वक्तव्यावर मला उत्तर द्यायला लावता. मला छोट करू नका .. असं वक्तव्य करून प्रफुल पटेल यांनी रोहित पवारांची खिल्ली उडविली. यासोबतच सुनिल तटकरे हे महाराष्ट्रातले आणि कोकणातले ज्येष्ठ नेते आहेत. त्यांना इतक्या वर्षाचा अनुभव आहे. ४०-४० वर्ष ज्या लोकांनी राजकारणात घालवले. त्यांना या नवीन लोकांच्या काही टोमण्यांचे उत्तर द्यायला लावता. आमचे पण काही स्टँडिंग आहे.... असा टोला प्रफुल पटेल यांनी रोहित पवारांवर लगावला.

उद्धव ठाकरे, राज ठाकरे हे एकाकाळी शिवसेनेत एकत्रचं होते, बाळासाहेब असताना. वेगळे झाल्यानंतर आता एकत्र आले तर, काय फरक पडणार आहे. एकनाथ शिंदे शिवसेना वेगळी करून लढलेत आज त्यांच्यासोबत अनेक आमदार आहेत, आणि परत ते निवडून आलेले आहेत. आता ते दोन एकत्र आले की, वेगळे राहिले तरी काही फरक पडत नाही. जी शिवसेनेची ताकद आहे ती एकनाथ शिंदेंकडे आहे. मुंबई महानगरपालिकेतील ९० पेक्षा अधिक जे नगरसेवक आहे ते एकनाथ शिंदे सोबत आलेले आहेत. आहे जे काही होईल ते मतपेटीच्या माध्यमातून लोकांसमोर येईल असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल पटेल यांनी केला व्यक्त केला.

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे एकत्र येऊन आगामी निवडणुका लढतील आणि कुठलीही अघोरी शक्ती त्यांना पराभूत करणार नाही, असं विधान संजय राऊत यांनी केलं होतं, त्यावर प्रफुल पटेल बोलत होते.

## सिंदखेडराजा येथे केक कापून झाडांचा वाढदिवस साजरा

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**लोणार** : झाडांचा आठवा वाढदिवस, वृक्षरोपण कार्यक्रमांमध्ये झाडांची लागवड, निगा व झाडांचा वाढदिवस अशा पद्धतीत आज १५ ऑगस्ट निमित्त वृक्षमित्र सुधाकर चौधरी यांनी झाडांचा आठवा वाढदिवस त्यांचे बंधू वाय बी चौधरी यांच्या हस्ते केक कापून साजरा केला.

दरवर्षी आपल्या पगारातून २५ ते ३० टक्के रक्कम खर्च करून झाडे लावतात व ती जतन करतात अशा पद्धतीचा कार्यक्रम गेला आठ वर्षापासून सतत सुरू आहे आणि आज या कार्यक्रमाप्रसंगी शेतकरी मित्र दिलीप चौधरी यांनी चौथ्या वर्गांच्या विद्यार्थ्यांसाठी झाडाची वाटप झालेल्या विद्यार्थ्यांना पुढच्या वर्षी नववा वाढदिवस साजरा करते वेळेस जे विद्यार्थी चांगल्या पद्धतीने झाडे जगवतील अशा विद्यार्थ्यांची निवड करून त्या विद्यार्थ्यांना पाचव्या वर्गापासून दहाव्या वर्गापर्यंत शालेय साहित्य पेन, वही व पुस्तक अशी वाटप पाचव्या वर्गापासून ते दहाव्या वर्गापर्यंत दरवर्षी करणार असे याप्रसंगी सांगण्यात आले तसेच जिजामाता नगर हे एक पर्यटन स्थळ बनावे प्रत्येकाच्या घरासमोर नारळाची, आंब्याची, जांभळाची झाडे व रस्त्याच्या कडेला नारळाची झाडे लावून सुशोभीकरनासाठी संपूर्ण घरासमोर व रामेश्वर मंदिरापासून रस्त्याच्या कडेने नारळाच्या झाडांची लागवड करण्यात येणार आहे, येणारा प्रत्येक पर्यटक हा जिजामाता नगर एक वस्तुसंग्रहालय म्हणून बघण्यासाठी यायला पाहिजे अशा पद्धतीत जिजामाता नगर वृक्ष लागवडीच्या माध्यमातून सुंदर नगर करायचे आहे, असे सुद्धा बोलताना शेतकरी मित्र दिलीप चौधरी म्हणाले.

या कार्यक्रमासाठी गावातील गावातील आजी-माजी नगरसेवक उपनगराध्यक्ष उपस्थित होते जिजामाता नगर मधील प्रमुख मान्यवर म्हणून दीपक भालेराव, दीपक जाधव, मुकेश जाधव, राजू गवई, चंद्रकांत बनसोड, विजय गवई, रामदास बोरुडे, विजय भालमोडे, रमेश बनसोड हे जिजामाता नगर मधील प्रतिष्ठित व्यक्ती व गावातील माजी सैनिक गवई साहेब, रामभाऊ आढाव, छगन मेहेत्रे नंदू मेहेत्रे तसेच नगरसेवक श्याम मेहेत्रे प्रकाश मेहेत्रे, कैलास मेहेत्रे, अतिश तायडे, विजू तायडे, संदीप मेहेत्रे, शाळेचे मुख्याध्यापक भाऊराव ठाकरे सर, मेहेत्रे सर, इतर मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते,



DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची पत्रकार परिषद

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** बबिता पवार यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. बेस्ट निवडणुकीत बबिता पवार आमच्या सोबत आहेत. मनसे युनियन आमच्या सोबत आहे. भारतीय जनता पक्षाच्या वतीने प्रवीण दरेकर आणि प्रसाद लाड हे दोघे मिळून लढत आहेत.



आर्थिक गुन्हे शाखेच्या वतीने प्रविण दरेकर आणि प्रसाद लाड यांचा काम बघता यांच्यावर कारवाई होणे आवश्यक आहे. असे मत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले. यापुढे ते म्हणाले की, सत्तेचा गैरवापर होत आहे. बेस्ट निवडणुक मनसे कर्मचारी सेना आणि शिवसेना मिळून पॅनल लढेल आणि निवडणूक जिंकेल. बीडला अजित पवार येऊन गेले. फक्त घोषणा करतात बाकी काहीही करत नाही. अजित पवार यांची ही इतरांप्रमाणे मातीची चूल आहे. गांजा पिऊन येत असेल, तर त्यासाठी पोलिस आहे. कायदा कोणी हातात घेऊ नये. कोणालाही मारहाण करू नये.बीड आणि धाराशिव जिल्ह्यात पवन ऊर्जा बाबत शेतकऱ्यांमध्ये असंतोष आहे. याबाबत शेतकऱ्यांवर दबाव आहे. त्यांचा आवाज कोणी ऐकत नाही. मसाजोग येथे घडलेले घटना सुद्धा पवन ऊर्जेतून झाली. रोहित पवार यांनी सुनीत तटकरे यांचे स्पष्ट नाव घेतले पाहिजे.अधिकारी यांनी मारहाण करू नये. पोलिस अधिकारी यांनी कोणत्याही आरोपीला वर्तवणूक करू नये. लाडकी बहीण योजना चर्चा होऊन गेली आहे. लाडक्या बहिण नकोश्या झाल्या आहेत. काही दिवसांत थोड्याच लाडकी बहीण राहतील. हृदयद्रावक घटना आहे. खरंतर मुलगा वाहून गेला तो आंदोलन करत होता. प्रशासनावर बाबदारी टाकली पाहिजे.असे मत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

### आमच्या पक्षात काय करावे हे बाकिच्यांनी सल्ला देण्याची गरज नाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांची विरोधकांवर टिका

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** बऱ्याच वर्षांची कोल्हापूरकरांची सर्किट बेंचची मागणी पूर्ण झाली आहे. कोल्हापूर सह आसपासच्या ६ जिल्ह्यांना याचा फायदा होणार आहे. सर न्यायाधीश गवई यांनी त्याबाबत चांगली भूमिका घेतली.



कोल्हापूरच्या विकासकामांबाबत मी २५ ऑगस्ट रोजी आढावा बैठक घेणार आहे. जिल्ह्याचबाबतचा राज्यस्तरीय सर्व आढावा त्यावेळी घेतला जाईल. त्यावेळी जे प्रलंबित प्रश्न गतीने मार्गी लागणे गरजेचे आहेत, ते प्रामुख्याने सोडवण्याचा प्रयत्न करु. मेळावा प्रत्येक पक्ष कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवण्यासाठी, पक्ष सदस्यांची संख्या वाढवण्यासाठी प्रयत्न करतो. शेवटी जनता जनार्दन सर्वस्व आहे. पण जनतेच्या मनात विश्वास निर्माण करायचे काम ज्या त्या पक्ष नेतृत्वाला करावे लागते. त्यासाठी मेळाव्याचा आयोजन केला आहे. राज्यात सगळीकडे पावसाचे अलर्ट देण्यात आले आहेत.जास्त पावसामुळे होणाऱ्या शेती पिकांच्या नुकसानीबाबत कृषी विभाग बारकाईने लक्ष ठेवून आहे. जिथे पंचनाम्यांची गरज आहे, त्याप्रकारे महायुती सरकार प्रयत्न करत आहे. आमच्या पक्षात काय करावे, हे बाकीच्यांनी फुकटचा सल्ला देण्याची गरज नाही.काहींना असं वाटतंय की, सगळ्या महाराष्ट्राचा मक्ता त्यांच्याकडेच दिला आहे.ज्यांनी त्यांनी आपला पक्ष सांभाळावा, इतरांमध्ये नाक खूपसायचे कारण नाही.अशी टिका उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली.

### रस्त्याची परिस्थिती पाहता लवकरच कल्याण डोंबिवलीचा दौरा करणार आदित्य ठाकरे यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** पलावाचा वर्ल्ड रेकॉर्ड पाहण्यासाठी लवकरच पुन्हा डोंबिवलीत येणार आहे.



रस्त्याची परिस्थिती पाहता लवकरच कल्याण डोंबिवलीचा दौरा करणार आहे. अशी माहिती माजीमंत्री आदित्य ठाकरे यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की, महाराष्ट्राचे राजकारण पाहतात दोन्ही भाऊ युतीबाबत ठरवतील. आजचा दिवस मी राजकारणावर बोलणार नाही, आज फक्त बालिश लोकं राजकारणावर बोलतात. दहा थर लावल्याबद्दल जय जवान गोविंदा पथकाचे आमदार तथा माजीमंत्री आदित्य ठाकरे यांनी पथकाचे अभिनंदन केले.

### पुण्यातील महिला पोलीस निरीक्षकांचा विनयभंग

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** केंद्रीय मंत्री नितीन गडकरी २३ जून रोजी पुणे दौऱ्यावर असताना, पुण्यातील भाजपाचे पुणे शहर सरचिटणीस प्रमोद कोंढरे यांनी वरिष्ठ महिला पोलीस निरीक्षकांचा विनयभंग केल्याची घटना घडली होती. या प्रकरणामुळे पुण्यात खळबळ उडाल्याचं समोर आलं होतं. अशातच या प्रकरणी पुण्यातील फरासखाना पोलीस स्टेशनमध्ये प्रमोद कोंढरे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, अटक करण्यात पोलिसांनी वेळ लावल्याने प्रकरण आणखी पेटल्याचं पहायला मिळतंय. अशातच आता या प्रकरणात शरद पवार यांची एन्ट्री झाली आहे.

# सरकारी शाळांमध्ये मतदान केंद्र न ठेवता भाजपच्या कार्यालयांमध्ये मतदान केंद्र ठेवावे : बच्चू कडूंची टिका

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** आगामी होऊ घातलेल्या निवडणुकीसाठी भाजपच्या कार्यालयातूनच मतदान झालं पाहिजे, मतदान केंद्र सर्व संपवले पाहिजे, भाजपच्या कार्यालय मध्येच मत पेट्या ठेवून त्यांनीच बटन दाबावं आणि आगामी निवडणुकांमध्ये नगरसेवक निवडून आणावे कशाला निवडणुकीचा खर्च करत बसता. माझ्या मतदारसंघात १३ हजार नावे डबल सापडलेली आहेत.लोकशाहीचा पतन करण्याचं काम जर सुरू असेल तर आम्ही निवडणूक आयोगाला एक पत्र देणार आहोत.सरकारी शाळांमध्ये मतदान केंद्र न ठेवता भाजपच्या कार्यालयांमध्ये मतदान केंद्र ठेवावं. अशी टिका माजीमंत्री बच्चू कडू यांनी केली.

डीवायएसपी अनंत कुलकर्णी शेतकऱ्याला लाथ मारली. तर, डीवायएसपी ला देखील लाथ मारली पाहिजे. डी वाय एस पी च्या ढुंगणावर आम्ही लाथ मारू, मंत्री आला तर मतदारांना लाथ मारणार निवडणूक आली तर त्याच्या घरापर्यंत जाणार. पंकजा मुंडे ने देखील हे समजायला हवं होतं पंकजा मुंडेंनी देखील निषेध व्यक्त करायला हवा होता.

जगाच्या पाठीवर हुशार असलेले आमचे मुख्यमंत्री ते स्वतः गृहमंत्री देखील आहेत. त्यांचे पोलीस असे वागत असेल सस्पेन्शन ने काही होणार नाही, त्या शेतकऱ्याकडून त्या डीवायएसपीच्या ढुंगणावर लाथ मारली पाहिजे. एकनाथ शिंदे लॉटरी मंत्री गणेश नाईक वक्तव्य, शिंदेंना लॉटरी लावली कोणी ..लावून दिली कोणी.सामान्य माणसाला थोडी लॉटरी लागते लॉटरी इथे फक्त मंत्राला आणि उद्योगपत्यालाच लागते. लॉटरी लावली कोणी हे गणेश नाईकांना माहिती आहे. ठाकरे बंधू एकत्र संजय राऊत दावा.यावर प्रतिक्रिया देताना बच्चू कडून यांनी त्या भानगडीत कशाला पडायाचं,त्यांच आपल्याला काय करायचं शेतीमालाला भाव नाही, दोन ठाकरे एकत्र आले, उद्धव ठाकरे बीजेपी कडे आले.

शरद पवार बीजेपीकडे आले. आमच्या शेतकऱ्याचं काय ? आमच्या शिक्षणाचा काय, आरोग्याचा काय?, हे दोघे एकत्र आल्यानंतर मुंबई जिंकली आमचं काय भलं होणार. उपराष्ट्रपती पदासाठी उपमुख्यमंत्री शिंदे, व अजित पवार दिल्लीला जाणार.त्यांना जावंच लागेल. नाही गेले तर, राहील कुठे इथे. त्यांना शेपटी हलवावेच लागतील, नाही हलवला तर कठीण आहे त्यांचं. हे फक्त इकडेच वाघ असतात. मी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या



पुतळ्यासमोर उभा आहे. आणि गवई साहेबांना मी सॅल्यूट करतो. गवई साहेबांनी जो बाणेदार पणा दाखवला आहे.

कारण की गवईमुळे अस वाटत आहे सुप्रीम कोर्ट तरी संविधानाचा आदर करून चालेल. ईव्हीएम व ईडीचा जो प्रकार आहे. या भाजपने ताब्यात घेतलेल्या संस्था आहेत. जसा म्हणाल तसा वापर सुरू आहे. संविधानाची चिरफाड सुरू आहे. हे म्हणतात लोकशाही आहे. मात्र, ही भाजपची हुकूमशाही राहणार अशी अवस्था आणून ठेवली आहे. बांगलादेशने निर्यात बंदी उठवली. जेव्हा भाव वाढतो तेव्हा शेतकऱ्याच्या हातात काहीच नसतं. भाव कमी असतो तेव्हा शेतकऱ्याच्या दारात शेतमाल सडतो. यामध्ये कायमची व्यवस्था होणे गरजेचे आहे. पेरणी ते कापणी पर्यंत सर्व कामे एमआरजीएसमध्ये घ्या ६० टक्के खर्च आम्हाला एमआरएस मधून कव्हर केला तर, आमचं जास्त नुकसान होणार नाही. हमी भावातही दम राहिला नाही. व्यापार खुला जरी झालं तरी जागतिक व्यापारात भाव कमी जास्त होतो तिथेही आमच मरण होतं. आम्ही एक तिसरा मार्ग दिला आहे.उत्पादन खर्च कमी करण्याची ताकद पेरणी ते कापणीची मागणी जी आहे. त्यामुळे नेहमीची ओरड राहणार नाही,असे मत यावेळी माजी मंत्री बच्चू कडू यांनी व्यक्त केले.

## त्यांचे १०० आले तर आमचे २५ तरी येतील गिरीश महाजनांच्या १०० प्लसच्या नाऱ्यावर भुजबळांची प्रतिक्रिया

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** जळगाव राष्ट्रवादी मेळावा,प्रतिभा शिंदे या सामाजिक नेत्या आहेत ते उद्या राष्ट्रवादी मध्ये प्रवेश करत आहेत.अजित पवार आणि मी उद्या जळगाव ला आहे. आंदोलन करण्याची मुभा आहे आणि जरांगे पाटील यांनी ते करावे, गिरीश महाजन १०० प्लसचा नारा देत असतील तर, आमचे २५ तरी असतील. अशी प्रतिक्रिया मंत्री छगन भुजबळ यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

यावेळी ते म्हणाले की, सेना राष्ट्रवादी युती चर्चा माझ्या कानावर अशी गोष्ट अली नाही. अजून कोण कुणासोबत जाणार अजून माहिती नाही. मुख्यमंत्री आणि इतर नेते निर्णय घेतील. गणेश नाईक वक्तव्य, गणेश नाईक सिनियर नेते आहेत ते अस का बोलले हे मला



माहिती नाही.मुंडे बंगला धनंजय मुंडे आमचे सहकारी आहेत. त्यांच्या अडचणी आहेत. मी त्या विषयी जास्त बोलणं योग्य नाही.मुख्यमंत्री या विषयात पाहतील. पोलीस अधिकारी विडिओ,स्वातंत्र्य मिळाले यात देखील आंदोलन करण्याचा अधिकार आहे.सरकारी कामात अडथळा न आणता आंदोलन करावं,संयमाने आंदोलन करायला पाहिजे.कुंभमेळ्याला किती पैसे मिळणार मला माहिती नाही मी माहिती घेतो. आम्ही एनडीए मध्ये आहोत. उपराष्ट्रपती निवडणूक आहे ते आम्ही एनडीए मध्ये लढणार आहोत.एकी दाखवण्यासाठी दिल्लीत जात आहेत. नाशिक मनसे ठाकरे गट मोर्चा, विरोधीपक्षाचे ते काम आहे. निवडणुका आले की ते करायला पाहिजे,समस्या जे आहेत.



त्याबाबत प्रशासनाने काळजी घेतली पाहिजे. खड्डे आणि वाहतूककोंडी वर लक्ष देणे गरजेचे आहे.नाहीतर तर याचा फायदा विरोधीपक्षाच्या लोकांना होतो. पवार पाटील एकत्र,जयंत पाटील यांच्या सोबत उलटसुलट चर्चा झाल्या.

मात्र, कार्यक्रमाला एकत्र येत असतील तर त्यात काय विषय नाही. रोहित पवार वक्तव्य कार्यक्रमाला अजित पवार भावकी सोबत असतात. बाळासाहेब थोरात वक्तव्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.माझ्या बद्दल सहानुभूती दाखवली त्याबाबद्दल त्यांचे आभार मानतो,अशी प्रतिक्रिया मंत्री छगन भुजबळ यांनी माध्यमांशी बोलताना दिली.



### संजय राऊतांसारख्या चिल्लर माणसाने मोदींवर बोलू नये ; मंत्री संजय शिरसाट यांची संजय राऊत यांच्यावर टिका

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** संजय राऊत यांची मोदींवर बोलण्यची लायकी देखील आहे का? यांच्यासारखे चिल्लर माणसाने मोदींवर बोलू नये. ज्यांची जगात प्रतिमा आहे, अशा माणसावर संजय राऊत यांनी बोलणं म्हणजेच सूर्यावर थुकण्यासारखे आहे.अशी टिका मंत्री संजय शिरसाट यांनी पत्रकार परिषदेत केली.

संजय राऊत यांनी जे विधान केले आहे. ते दोन्ही पक्षाचे प्रवक्ते म्हणून केले आहेत का? याबद्दल शंका उपस्थित होत आहेत. दोन्ही भाऊ एकत्र आले, महाराष्ट्राने आनंद साजरा केला व आम्हालाही आनंद झाला. परंतु काल त्यांनी केलेले एका स्टेटमेंटमुळे आजपर्यंत संजय राऊत यांनी जे काही भाकीत केली आहे. ती भाकीत किती पूर्ण झाली आहेत हा इतिहास आहे. त्यांची युती होवो, त्यांनी सत्ता मिळवण्यासाठी प्रयत्न करावे. ही निवडणूक आहे, निवडणुकीत जो जिंकेल तो खरा बादशाह होत असतो. एकदा येणारी निवडणूक लागू द्या, त्यानंतर हे सर्व चित्र स्पष्ट होईल. यांना याच्याशी काय करायचे हे मला कळत नाही. यांची काय लोकप्रियता आहे. आमच्या मतांवर निवडून आलेले राज्यसभा सदस्य कधी नगरसेवक सुद्धा झाले नाही. हे नेतृत्वाचे गुण कोणाला सांगत आहेत.

या विधानसभा निवडणुकीत एकनाथ शिंदे यांनी ६० जागा निवडून आणल्या आहेत. त्याही छातीवर बसून ठोकून निवडून आणल्या आहेत. इथे नेते काही बोलत नाही मात्र, या संजय राऊत सारख्या माणसाने पक्षाला धुळीस मिळवले आहे, हे मात्र निश्चित आहे.जर घोटाळा झाला असेल, तर प्रत्येक गोष्टीची चौकशी होत असते. घोटाळा झाला नसेल, तर चिंता काय आहे. तिथे काहीतरी आहे म्हणून एवढी मोठी ताकद लागते, असा त्याचा अर्थ होऊ शकतो. चौकशी अंतिम जे काही होईल ते होईल. आम्ही कायदेशीर कारवाईत कुठेही पडत नाही.संजय राऊत यांची मोदींवर बोलण्यची लायकी देखील आहे का? यांच्यासारखे चिल्लर माणसाने मोदींवर बोलू नये. ज्यांची जगात प्रतिमा आहे, अशा माणसावर संजय राऊत यांनी बोलणं म्हणजेच सूर्यावर थुकण्यासारखे आहे.अशी टिका मंत्री संजय शिरसाट यांनी केली.

## कुर्डुस गावात विहिरीवरील दहीहंडी फोडण्याची ३२ वर्षांची अनोखी व लोकप्रिय परंपरा कायम





दैनिक आपला विदर्भ

**रायगड/प्रतिनिधी :** रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील विहीरीवर मधोमध दहीहंडी बांधून उडी मारून फोडण्याची अनोखी व लोकप्रिय परंपरा आजही कायम आहे. ही दहीहंडी फोडणे एक मोठी कला मानली जाते, ही दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदा मोठ्या प्रमाणात सहभागी होतात, तर ही अनोखी दहीहंडी पाहण्यासाठी प्रेक्षकांची मोठी गर्दी असते. कुर्डुस गावात विहिरीतील दहीहंडी अत्यंत लोकप्रिय आहे. गावातील तरुणांनी विहिरीच्या मध्यभागी दहीहंडी बांधण्याची परंपरा मागील ३२ वर्षांपासून जोपासली आहे.

कुर्डुस गावातील देऊळ आळीतील पिंगळे, पाटील, शेरमकर, थळे, केणी परिवारातील तरुणांनी १९९२ मध्ये एकत्र येत, वेगळे काहीतरी करण्याच्या विचारातून दहीहंडीची संकल्पना उदयास आली. घरे, मंदिरासमोर दहीहंडी बांधली जाते. हंडी फोडण्यासाठी २ ते ३ थर रचले जातात. आणि दहीहंडी फोडली जाते. आतापर्यंत ही दहीहंडी फोडताना कोणालाही दुखापत किंवा इजा झालेली नाही. यावर्षी देखील ही दहीहंडी फोडण्यासाठी व हा उत्सव पाहण्यासाठी अलोट गर्दी उसळली होती.

# माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांनी दिला जुन्या आठवणींना उजाळा

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** संपूर्ण आयुष मी कामगार चळवळीत घालवले. अनेक प्रश्न चळवळी केल्या, आमच्या पिढीने कुठे कुठे हादरा देण्याचे काम केले.अहिल्यानगर जिल्हा जुन्या काळात गाजलेला जिल्हा होता. साखर चळवळ सुरू झाली, सहकार आणि खाजगी असे अनेक साखर कारखाने होते. कामगार हिताचा प्रश्न आला की, नेतृत्व उभे राहिले. त्यात साथी किशोर पवार यांचे नाव पुढे येते.माझ्या आयुष्यातील सर्वात पाहिला मोर्चा प्रवरानगरमध्ये काढला. अशा अनेक जुन्या आठवणींना माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी उजाळा दिला. माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, कारखाना बंद करायला सांगायला गेलो. आमच्यावर लाठी हल्ला झाला. त्यात आम्हाला पण लाठ्या पडल्या, लाठ्या पडल्यावर काय होत तुम्ही सगळे चळवळीतील आहेत. तुम्हाला माहिती आहे.आजपर्यंत मी नेहमी कामगार आणि सरकार यांच्यामध्ये मध्यस्थी भूमिका घेतली. साखर कामगार आजपर्यंत संघर्ष करत आले, त्यांचे अनेक प्रश्न सोडवले. आज देशात साखर व्यवसाय महत्वाचा आहे. एकवेळ राज्यात कापड गिरणी होत्या, मुंबईमध्ये अनेक गिरणी होत्या, २०० गिरण्या होत्या. आज एकच राहिलेली आहे. यात चळवळ महत्वाची भूमिका होती. आज वाईट वाटते. आज गिरणी मुंबईत दिसत नाहीत. माणसे नाहीत, चाळीस पन्नास मजली इमारती दिसतात. त्या ठिकाणी पण मराठी माणूस कुठेच दिसत नाही. आज कामगार पिळवणूक होत असेल, तर विचार करावे लागेल. आज साखर सहकारी साखर कारखाने कमी झाले, खाजगी कारखाने झाले आहेत. कारखाने सुरू राहिले पाहिजेत. पण कामगार पण टिकले पाहिजेत. आज जगात दोन नंबरवर आपला देश आहे. साखर व्यवसायात आहेत.आज सहकार चळवळ संपते आहे. माझ्याकडे चांगले कारखाने आहेत, चालत आहेत. पण भीमा पाटसकडे पाहिले तर वाईट वाटते. त्या कारखाने मालक बंगलोरला राहतात. आज राज्यातील चित्र वाईट आहे. आज संगमनेर कारखाना चागला चालतो. पण आजुबाजुला कारखाने काढले, तर त्याची चिंता वाटते. २० हजार टन कारखाने आहेत. पण कामगार कमी झाले.मला आनंद आहे की, साखर उद्योग आणि कामगार विषय घेतला पाहिजे, संघ महाराष्ट्र



सरकार यांना विश्वासात घेऊन काम केले पाहिजे.सहकारी साखर कारखाना चित्र बदलले आहे. ४० टक्के कामगार सभासद आहेत. साखर फक्त करून चालणार नाही. तर इतर उद्योगही केले पाहिजेत. सरकारला विश्वासात घेऊन काम करावे लागेल. कामगार संघटना ने कारखानदारी टिकली.माझा घसा बसल्याने मी जास्त बोलू शकलो नाही. आजचा हा कार्यक्रम साखर व्यवसायातील व्यक्तीचा सन्मान आहे. असे बोलून माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला.

# डॉ.मंगेश बाजड यांच्या वाढदिवसाच्या निमित्त जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

## वायफळ खर्चांना फाटा देत सामाजिक उपक्रम : विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य






**दैनिक आपला विदर्भ**

**डोणगाव/प्रतिनिधी :** वैद्यकीय क्षेत्राबरोबरच सामाजिक,कृषी आदी विविध क्षेत्रात समाजपयोगी उपक्रम राबवून गोरगरिबांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणारे डॉ. मंगेश पाटील बाजड यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त वायफळ खर्चांना फाटा देत वाढदिवसाच्या दिवशीही सामाजिक कार्य पार पाडले. वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्य वाटप करून गोरगरिबांसोबत वाढदिवस अत्यंत साध्यापद्धतीने साजरा केला.

डोणगाव परिसरातील गोरगरीब जनतेची रुग्णसेवा करण्याबरोबरच सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या डॉ. मंगेश बाजड यांचा १४ ऑगस्ट रोजी वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. डॉ. मंगेश बाजड यांनी बेरोजगारांसाठी पाटील इरिगेशनच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक सोयीसुविधा उपलब्ध करून देत शेतीतही अमुलाग्र बदल करीत शेतकऱ्यांचा विकास करण्याचा ध्यास घेतला आहे. गोरगरिबांसाठी संपूर्ण आयुष्य खर्ची करत असलेल्या डॉ. मंगेश बाजड यांच्या वाढदिवसानिमित्त १४ ऑगस्ट रोजी वाढदिवसानिमित्त पार्टी अथवा इतर खर्चिक व बडेजाव करणारा कार्यक्रम न घेता डोणगाव परिसरातील अनेक शाळांमध्ये जाऊन चिमुकल्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून चिमुकल्यांसोबत बर्थडे सेलिब्रेशन केले आहे. वाढदिवसानिमित्त परिसरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले असल्याने विद्यार्थ्यांमध्येही आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

डॉ. मंगेश बाजड यांचा वाढदिवस म्हणजे जिल्हा परिषद शाळांमध्ये साजरा होऊन चिमुकल्यांना काहीतरी भेट मिळण्याची आशा लागून असलेल्या चिमुकल्यांनी डॉ. मंगेश बाजड यांना वाढदिवसानिमित्त आपल्या ओबडधोबड शब्दात शुभेच्छा देत डॉ. मंगेश बाजड यांच्याही चेहऱ्यावर हास्य फुलविले. तर, मंगेश बाजड यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व मिठाई वाटप करून चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवित वाढदिवस साजरा केला.

यावेळी डॉ.मंगेश पाटील बाजड. डॉ. सौ.सारीका मंगेश बाजड. सुनील पळसकर. बालप्रसाद आखाडे यांच्यासह विविध वैद्यकीय व शैक्षणिक क्षेत्रासह विविध मान्यवरांची उपस्थिती होती..

## विविध वृत्त...

### संबंधित विभागाच्या ढिसाळ कारभाराने बसचा अपघात; सुदैवाने जीवितहानी नाही





**दैनिक आपला विदर्भ**

**डोणगाव/प्रतिनिधी :** झेंडावंदनासाठी तब्बल ८० विद्यार्थी घेऊन डोणगाव कडे घेऊन येत असलेल्या बसचा अपघात होऊन बसच्या काचा फुटल्याची घटना १५ ऑगस्ट रोजी आरेगाव ते डोणगाव मार्गावर घडली. सदर घटनाही रस्त्याच्या दुरावस्थेमुळे घडली असून संबंधित विभागामध्ये मात्र याबाबत तीव्र रोष व्यक्त केला जात आहे.

१५ ऑगस्ट रोजी झेंडावंदनासाठी आरेगाव येथील तब्बल ८० विद्यार्थी घेऊन एक बस डोणगावकडे येत होती. रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाल्याने व रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठ्या वृक्षाच्या फांद्या मध्यात आल्याने अनेक वेळा वाहनाचे नुकसान होत आहे.१५ ऑगस्ट रोजी सकाळी ६.३० वाजता च्या दरम्यान आरेगाव येथून विद्यार्थी घेऊन बस डोणगावकडे जात असताना समोरून एक वाहन आले.त्या वाहनाला बाजू देण्याच्या प्रयत्नात वाहन रस्त्याच्या बाजुला घेतले असता एका बाभळीच्या झाडाच्या फांद्या बसच्या समोरील काचावर लागून बसचे काच फुटल्याची घटना घडली. सुदैवाने या घटनेमध्ये कोणालाही दुखापत झाली नाही.

मात्र, बसचे मोठे नुकसान झाले आहे. याबाबत स्थानिक नागरिकांनी रोष व्यक्त करीत अनेकवेळा रस्ता दुरुस्त करण्याची मागणी केली.मात्र, याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. आता पुन्हा निवेदन देऊन रस्ता दुरुस्त करून रस्त्यावर आलेले झाडे जोडपे तोडण्याची मागणी करणार असल्याची प्रतिक्रिया नागरिकांनी दिली आहे.तर, वाहन चालक यांनी माहिती देताना समोरून वाहन आल्याने त्या वाहनाला बाजू देण्याचा प्रयत्नात रस्त्यावर आलेल्या बाभळीच्या फांद्या लागल्याने बसच्या काचा फुटल्याचे सांगितले. या घटनेत कोणालाही दुखापत झाली नाही. मात्र, बसच्या मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचे सांगितले. रस्त्याच्या अत्यंत दयनीय अवस्थेबाबत ग्रामस्थांनी संबंधित विभागाबाबत रोष व्यक्त करत सदर रस्ता तात्काळ दुरुस्त करून देण्याची मागणी केली आहे.

### अजितदादा गावकीचा विचार करताना भावकीला मात्र विसरले; दादा बाजूलाच असतानाच रोहित पवारांचा सणसणीत टोला

**मुंबई /प्रतिनिधी :** अजितदादा आता गावकीचा विचार करतात, मात्र भावकी विसरले आहेत, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी अजित पवार यांना सणसणीत टोला लगावला. आज इस्लामपूरमध्ये सरोज पाटील माई यांच्यासमोर बोलताना रोहित पवार यांनी चांगलीच फटकेबाजी केली. निमित्त होते, इस्लामपूरमधील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या प्रा. डॉ. एन.डी. पाटील विधी महाविद्यालय, श्रीमती सरोज नारायण पाटील (माई) मानसशास्त्र संशोधन केंद्र आणि प्रा. डॉ. एन. डी. पाटील बहुउद्देशीय सभागृहाचा उद्घाटन सोहळा. यावेळी व्यासपीठावर राजकीय दिग्गज उपस्थित होते. उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह दिग्गज मंडळी एकत्र आल्याने रोहित पवार काय बोलणार याकडे लक्ष होते.

अजित दादा गावकीचा विचार करतात, मात्र, भावकीला विसरला आहात

तत्पूर्वी, सरोज पाटील माई यांनी बोलताना रोहित पवार यांच्या कार्याचा आढावा घेत कौतुकाची थाप दिली होती. आमचा लाडका रोहित चांगला धीट झाल्याचं त्यांनी म्हटलं होतं. त्यानंतर रोहित पवार बोलण्यासाठी उभा राहिल्यानंतर काय बोलणार याकडे लक्ष होते. अजित पवार व्यासपीठावर असल्याने रोहित पवार यांनी चांगलीच फटकेबाजी केली. त्यांनी सांगितले की अजित दादा आता गावकीचा विचार करतात. मात्र, भावकीला विसरला आहात. एकत्र असताना भाषणाचा कौतुक करायचे, मला मार्गदर्शन करत होते असे रोहित पवार यांनी सांगितलं.

दरम्यान, रोहित पवार यांनी बोलताना बंगल सोडत नसलेल्या धनंजय मुंडे यांच्यावरही तोफ डागली. ते म्हणाले की मंत्रीपद गेले तरी काहीजण बंगला सोडत नाहीत. मात्र त्यांनी एनडी पाटलांकडून आदर्श घ्यावा असे ते म्हणाले. त्यांनी पुढे सांगितले की जयंत पाटील, स्वर्गीय आर आर पाटील, स्वर्गीय पतंगराव कदम यांनी सांगली जिल्ह्याच्या विकासाचा विचार केला होता.

## शिर्डीच्या साईबाबा मंदिरातही श्रीकृष्ण जन्माष्टमी साजरी; दर्शनासाठी भाविकांची मांदियाळी, दुपारी रंगणार दहीहंडीचा जल्लोष

**शिर्डी/प्रतिनिधी :** श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव देशभरात मोठ्या भक्तीभावात साजरा करण्यात आला. साईबाबांना श्रीकृष्णाचा अवतार मानत या पावन दिवशी साईबाबांचं दर्शन घेण्यासाठी आणि दहीहंडीचा उत्सव साजरा करण्यासाठी असंख्य भाविक साईदरबारी हजेरी लावतात. तर शुक्रवारी मध्यरात्री १२ वाजता साई मंदिरात श्रीकृष्ण जन्मोत्सव मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. बाळकृष्णाचं मोठ्या उत्साहात स्वागत : साईबाबांच्या समाधी मंदिरात चांदीच्या पाळण्यात श्रीकृष्णाची चांदीची मूर्ती ठेवून बाल कन्हैयाचं गुणगान करण्यात आलं. साई समाधी मंदिरासमोरील स्टेजवर ह.भ.प. स्मिता आजेगावकर यांनी रात्री १० ते १२ दरम्यान सादर केलेल्या कीर्तनाला उत्तम प्रतिसाद लाभला.

## बेलगाव येथील महादजी दर्याजी पाटील माध्यमिक विद्यालय बेलगाव या ठिकाणी स्वातंत्र्य दिन साजरा

**डोणगाव/प्रतिनिधी :** येथून जवचळ असलेल्या बेलगाव येथील महादजी दर्याजी पाटील माध्यमिक विद्यालयात तिरंगा सप्ताहाचे आयोजनाबरोबरच स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला.

स्वातंत्र्य दिनानिमित्त १३ ऑगस्ट रोजी प्रथम दिवशी ध्वजारोहण करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे संचालक प्रकाशराव बाजड यांच्याहस्ते करण्यात आले. तर, ध्वजारोहक ग्रामपंचायत सदस्य पती ओम वानखेडे यांच्याहस्ते करण्यात आले. १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिन मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. स्वातंत्र्यदिन प्रभातफेरीने स्वातंत्र्य दिन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. ध्वजारोहण कार्यक्रमाचे उद्घाटन माजी सरपंच भागवतराव वानखेडे यांनी केले.तर, ध्वजारोहण संस्था अध्यक्ष अड्. सुरेशराव वानखेडे यांच्या हस्ते पार पडले.

यामध्ये वैभव कांबळे या विद्यार्थ्यांने झेंडा गीत सादर केले. तर, कल्याणी गोपाल वानखेडे, धम्मदीप विठ्ठल वानखेडे, क्रांती सुधीर वानखेडे या विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनावर आपले विचार व्यक्त केले. सदर कार्यक्रमासाठी शाळेच्या प्रांगणात सुंदर अशा संगीत कवायतीचे आयोजन प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आले होते.

कार्यक्रमाला संस्थाध्यक्ष अड्. सुरेशराव वानखेडे,नारायणराव वानखेडे, पोलीस पाटील दिनकरराव बाजड, प्रकाशराव बाजड, केशवराव गुरुजी, उत्तम महाराज, मारुती बोरकर, रामराव पाटील वानखेडे, माजी सरपंच अनिल वानखेडे, पत्रकार गजानन जाधव, भागवतराव वानखेडे, माजी सरपंच प्रकाश राऊत, दिनकर धवसे,सुरेश ठोके, परमेश्वर वानखेडे, सुनील वानखेडे, हुजूरभाई, कैलास वानखेडे, माणिकराव वानखेडे,माजी सरपंच अशोक माऊली, किशोर पवार, ग्रामपंचायत सदस्य अर्चनाताई ओम वानखेडे,सतीश वानखेडे, विनोद बाजड, माजी सदस्य ग्रामपंचायत कैलास राठोड,मनीष वानखेडे, रफिक वामनराव गवळी, ज्ञानेश्वर वानखेडे, दिनकरराव वानखेडे यासह गावातील बहुसंख्य नागरिकांची उपस्थिती होती.

यामध्ये सर्वांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली. त्यानंतर संस्थाध्यक्ष अड्. सुरेशराव वानखेडे यांनी मार्गदऱ्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन एन. टी. गीते यांनी केले.तर, आभार मुख्याध्यापक दीपक कुटे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक कावरखे, वानखेडे, गीते, मेटांगळे, रहाटे, जायभाये, गायकवाड, बागुल, खुशालराव मेटांगळे, साखरे, शिक्षकेतर कर्मचारी विजय दाभाडे, पुनम वानखेडे, गजानन देशमुखसह विद्यार्थी विद्यार्थिनींनी परिश्रम घेतले.

## नागरे महाविद्यालयाने स्वातंत्र्यदिनी राबविले विविध उपक्रम




**दैनिक आपला विदर्भ**

**■ देवानंद सानप**

**बिबी :** स्थानिक दुसर बीड १५ ऑगस्ट रोजी ७८ वा वर्धापन दिन व ७९ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला राष्ट्रीय ध्वजाचे अनावरण माजी सैनिक श्री सुधाकरराव मुंडे यांच्या शुभहस्ते करण्यात आले नारायणराव नागरे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करून स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणाची आहुती दिली आयुष्य समर्पित केले त्यांच्या प्रती कृतज्ञता म्हणून रक्तदान शिबिर, बेटी बचाव बेटी पढाव,एक पेड मा के नाम, हर घर तिरंगा, मतदान जनजागृती,सिकलसेल,पंतप्रधान जनधन योजना, ऊर्जा नूतनीकरण योजना, शासनाच्या या उपक्रमाची समाजामध्ये जनजागृती व्हावी याकरिता लेझीम ढोल ताशांच्या गजरामध्ये प्रभात फेरी काढण्यात आली. या प्रभात फेरीमध्ये पटनाट्याच्या माध्यमातून योजनांचा जयघोष करण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी तथा प्राचार्य डॉक्टर विजय नागरे आधीसभा सदस्य तथा व्यवस्थापन परिषद सदस्य संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांनी या कार्यक्रमाचे प्रस्ताविक व आयोजन केले या रक्तदान उपक्रमामध्ये ३१ रक्तदात्यांनी रक्तदान केले या कार्यक्रमासाठी दुसर बीड नगरीतील तसेच परिसरातील प्रतिष्ठित नागरिक माजी सरपंच श्री छाजड माजी सरपंच पती प्रकाशराव सांगळे उपसरपंच शेख अब्रार पत्रकार संस्थेच्या संचालिका प्राध्यापक धनश्रीताई कायंदे माजी उपसरपंच तथा पत्रकार बाजीराव वाघ श्री बबनराव उदावंत सीमा कापड केंद्राचे बबनराव देशमुख श्री अशोकराव सोसे प्रवीण देशमुख प्राध्यापक पंडितराव सानप शेख जाकीरभाई प्राध्यापक सागर सांगळे सेवानिवृत्त मुख्याध्यापक दत्तात्रय नागरे शेख इरफान श्री अशोकराव सांगळे वैष्णवी कापड केंद्राचे संचालक बुधवत माजी विद्यार्थी ऋषिकेश देशमुख बाबासाहेब सरकटे लेझीम पथकाचे उत्कृष्ट प्रदर्शन प्राध्यापक शेख युनूस प्राध्यापक गजानन राठोड कार्यक्रमास सूत्रसंचालन राम पोखरकर यांनी केले कार्यक्रम यशस्वी साठी डॉक्टर गणेश घुगे डॉक्टर दीपक देशमानेप्राध्यापिका नयना गवारे प्राध्यापक मिलिंद गवई प्राध्यापक देवानंद नागरे प्राध्यापक शंकर मेहर श्री गजानन मुंडे श्री आणि रणमळे श्री पंढरे यांची उपस्थिती होती.

## ठाण्यात या गोविंदा पथकाने लावले १० थर, टाळ्यांच्या कडकडाटात झाले कौतुक

**ठाणे/प्रतिनिधी :** मुंबई ठाण्यासह सर्वत्र दहीहंडी उत्सवाच्या निमित्ताने उत्साह आणि जल्लोष दिसत आहे. गोविंदा पथके दहीहंडी फोडण्यासाठी बाहेर पडली आहेत. या उत्साही वातावरणात एक आनंदाची बातमी आली आहे. ठाण्यातील संस्कृती प्रतिष्ठानने आयोजिलेल्या दहीहंडी उत्सवात एका गोविंदा पथकाने सात, आठ किंवा नऊ नाही तर चक्क दहा थर लावले आहेत. कोकण नगर या गोविंदा पथकाने ठाण्याच्या संस्कृती प्रतिष्ठानने आयोजिलेल्या दहीहंडी उत्सवात चक्क दहा थर लावण्याची कमाल केली आहे. दहा थर लावणे हे अतिशय आव्हानात्मक काम आहे. यासाठी मानवी सामर्थ्याची कसोटी लागते. कोकण नगर या गोविंदा पथकाने हे आव्हान पेलले आणि ठाण्याच्या संस्कृती प्रतिष्ठानने आयोजिलेल्या दहीहंडी उत्सवात दहा थर लावून सलामी दिली. काही दिवसांपूर्वी प्रो गोविंदा स्पर्धा झाली. या स्पर्धेत कोकण नगर या गोविंदा पथकाने १० थर लावण्याचा प्रयत्न केला होता.

## रिसोड तहसील कार्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात; अप्पर जिल्हाधिकारी मुंबई डॉ.नाईक यांची प्रमुख उपस्थिती

**दैनिक आपला विदर्भ**

**रिसोड/प्रतिनिधी :** येथील तहसील कार्यालयात ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी मुंबई येथील अप्पर जिल्हाधिकारी डॉ. विकास नाईक यांची उपस्थिती होती ध्वजारोहणानंतर शहिदांचे आई वडील, माजी सैनिक, अप्पर जिल्हाधिकारी डॉ. विकास नाईक यांचा सत्कार करण्यात आला यावेळी व्यासपीठावर तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर अप्पर जिल्हाधिकारी मुंबई डॉ.विकास नाईक सेवानिवृत्त




डी वाय एस पी सुभाष माकोडे नायब तहसीलदार गजानन जवादे, सुभाष जाधव, कुळमेथे शेंडे ,पुरवठा विभागाचे गणेश तांगडे उपस्थित होते.

विकास नाईक हे ८ मार्च १९९८ ते ३१ डिसेंबर २००० या कालावधीत रिसोड येथे तहसीलदार म्हणून कार्यरत होते त्यानंतर पदोन्नती नंतर लातूर धाराशिव आंबेजोगाई या ठिकाणी महसूल विभागात एक सक्षम अधिकारी म्हणून काम पाहिले त्यांच्या कामाची दखल घेत तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी त्यांची नियुक्ती मुंबई येथे केली मुंबई येथे हजारो अतिक्रमण धारकांचे अतिक्रमण काढून मुंबईतील महत्त्वाचा भाग अतिक्रमण मुक्त केला व त्यांचे पुनर्वसन केले आज ते मुंबई येथे अप्पर जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत आहेत ते ३१ डिसेंबर २०२५ रोजी सेवानिवृत्त होत असल्यामुळे पहिले ध्वजारोहण रिसोड येथे केले असल्यामुळे काल दिनांक १५ ऑगस्ट रोजी शेवटच्या ध्वजारोहणाला उपस्थित राहिले विशेष म्हणजे पहिल्या ध्वजारोहणाला त्यांनी जो ड्रेस परिधान केला होता तोच ड्रेस त्यांनी परिधान केला होता. त्यांचा महसूल विभागाकडून पत्रकार संघाकडून व गावातील प्रतिष्ठित नागरिकाकडून मोठा सत्कार करण्यात आला.